किंमत ४ आणे.

म. ग्रं. सं. ठाणें

सन

लेखक

पुस्तकाचें नांव

चें पसरत यावरून

. सं. ठाणे

काव्य

२०४८

२५१

काव्य

धक साधुचरित्र.

ना.ग्रं. रा.
१०३३

# चित्तवेधक साधुचरित्र.

अथवा

## सत्यनारायणकथेंतील साधूची कथा.

हें पुस्तक

बाळकृष्ण दिनकर वैद्य कन्नडकर
यांनीं केलें

तें

दक्षिणा प्राईज कमेटीनें पसंत केल्यावरून

जनमनरंजनार्थ

मुंबईमध्यें,
जावजी दादाजी यांनीं
"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति दुसरी.

सन १८९० इ०.

किंमत ४ आणे.

आली

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क
प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

कोणत्याही भाषेची योग्यता वाढण्यास त्या भाषेंत ग्रंथविपुलता अवश्य असली पाहिजे; त्यावांचून ती विशेष महत्त्वास येणार नाहीं. संस्कृत, लॅटीन, अरबी, पराशिअन इत्यादि भाषा विशेष महत्त्वास येण्यास तींत विद्वज्जनांनीं परिश्रम घेऊन अनेक प्रकारच्या विषयांवर अनेक ग्रंथ केले, हेंच मूळ कारण होय. कांहीं दिवसांपूर्वी इंग्रजी भाषा ही इतकी [illegible]ष्ट दशेंत होती कीं, सभ्यलोक त्या भाषेंत बोलावयासही लाजत. परंतु ज्या वेळेस त्या भाषेंत बेकन, पोप, न्यूटन, शेक्स्पियर, बैरन इत्यादि विद्वज्जनांनीं परिश्रम घेऊन पुष्कळ ग्रंथ केले, तेव्हांपासून तिचें महत्व वाढून दिवसानुदिवस ती अधिक उदयास आली; व तींत शेंकडों ग्रंथ होऊं लागले. येणेंकरून ती विद्वज्जनग्राह्य झाली, इतकेंच नाहीं; किंबहुना लॅटिन, संस्कृत, पराशिअन, इत्यादि भाषेची बरोबरी करील अशा योग्यतेस आली आहे. अस्तु, याचप्रमाणें प्राकृत भाषा ही कित्येक दिवसांपूर्वी अतिशय नीच स्थितींत होती. पुष्कळ विद्वान् लोक हिचा अव्हेर करून गीर्वाण भाषेंत बोलत असत; परंतु मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, मोरोपंत, वामनपंडित आदिकरून महान महान श्रेष्ठ कवींनीं हिचा अंगिकार करून ह्या भाषेंत पुष्कळ पद्यरूपी ग्रंथ करून लिहून ठेविले. अहाहा! परोपकारार्थ किती त्यांचे परिश्रम! त्यामुळें ही भाषा किती योग्यतेस आली! त्या वेळेस त्यांचा त्या स्तुत्यकृत्यास उत्तम प्रकारचा राजाश्रय मिळता, अगर प्रख्याति होण्यास आतांच्यासारखे छापखाने असते, तर त्यांस किती अधिक उमेद आली असती! असो परमेश्वरकृपेनें सद्यः मात्र बरींच साधनें अनुकूल आहेत; याजव

ह्या भाषेचा चांगला ऊर्जितकाळ येईल असा रंग दिसत आहे. बहुत विद्वान् लोक हींत गद्यरूपी देखील ग्रंथ लिहूं लागले, आणि दयाळु सरकार तर मोठ्या उदारपणें नवीन ग्रंथ करणारांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें इनामें देत आहे, यामुळें दिवसानुदिवस अधिक उत्तेजन येऊन बरीच ग्रंथवृद्धि होऊं लागली आहे. असाच क्रम कांहीं दिवस चालल्यास खरोखर लौकरच ती संस्कृत भाषेच्या जवळ जवळ येऊन पोहोंचेल. प्रस्तुत सरकारचें विद्यावृद्धीकडे पूर्ण लक्ष, आणि तेणेंकरून मनोरंजक, उपयुक्त व शास्त्रीयविषयांवर अनेक प्रकारचे ग्रंथ करण्याचा झटून चाललेला प्रयत्न, हें पाहून मजलाही एक लहानसें पुस्तक करण्याची उमेद आली.

हल्लीं हें जें मी अल्पमतीनें पुस्तक केलें आहे, हें विशेष महत्त्वाचें किंवा शास्त्रीयविषयांवर आहे असें नाहीं; परंतु ह्या लहानशा पुस्तकांत जी कथा घेतली आहे, तींत जगन्नियंत्या परमेश्वराची अघटित करणी व त्याचें भक्तवात्सल्य, आपत्कालीं सद्वर्तन रक्षिल्याचें फळ व पातिव्रत्यधर्माची योग्यता इत्यादि हितकर गोष्टी थोडक्यांत दृष्टांतरूपें चांगल्या दर्शविल्या आहेत. ही कथा मूळ संस्कृत भाषेंत स्कंदपुराणीं रेवाखंडीं आहे त्या आधारें केलेल्या "श्री सत्यनारायण कथेच्या" पुस्तकावरून मीं प्राकृत भाषेंत पद्यरूप रचली.

हींत नानावृत्तांचे श्लोक, आर्या, साकी, दिंडी, पद, कटिबंध, ओवी व गीतें इत्यादि अनेक प्रकारचीं पद्यें आहेत. ह्या कथेंत शोकरस प्रधान असून प्रसंगीं मध्यें मध्यें व शेवटीं आनंदही पुष्कळ आहे आणि स्वाभाविक कथा चमत्कारिक आहे तेणेंकरून वाचीत असतां पुढें काय आहे हें पाहण्याविषयीं अत्युत्कंठा प्राप्त होते. अस्तु, ही रचना करीत असतां प्राकृत भाषेच्या धोरणानें व कोठें कोठें रसाच्या पुष्टीकरणार्थ न्यूनाधिक करून वाढविलें आहे. मूळांतील मार्मिक अर्थाकडे नजर देऊन प्राय: तो यथामति

जितका राखवेल तितका राखिला आहे. माझा पद्यरचना करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे, तरी सूज्ञ जनांनीं चुकांची क्षमा करून मजला दुसरें ++ करण्याविषयीं उत्तेजन द्यावें; हीच प्रार्थना आहे. परमेश्वरकृपेनें सिद्धीस जावो.

या पुस्तकास दक्षिणा प्राईज कमेटी पुणें व कै० श्रीमंत रा० रा० रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब उमदेतुलमुलुख बहादूर आणि बदलापूर येथील सावकार ओक यांनीं आश्रय दिला सबब मी त्यांचे आदरपूर्वक आभार मानितों.

**बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर.**

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या आवृत्तींत पद्यरचनेंतील कित्येक चुकांची दुरुस्ती केली आहे. व शुद्धाशुद्ध पाहण्याकडेही विशेष लक्ष्य दिलें आहे.

**बा० दि० वै०.**

# चित्तवेधक साधुचरित्र.

## मंगलाचरण.

### श्लोक ( मंदाक्रांता. )

श्रीविष्णूच्या चरणकमला वंदुनी त्या दयाळा[1] ।
श्रीब्रह्मेशा नमन करितों निर्मिता जो जगाला ॥
जो विश्वांचा[2] लय करिल त्या चिंतुनी शंकराला ।
हेरंबा मी तुजशि नमितों जोडुनीयां करांला ॥ १ ॥

### गीति.

विघ्नविनाश[3] कराया तुजला अत्यंत दीनही नमती ।
पाहुन तदीय[4] रीती नमितों मी तुजशि दीन हीनमती[5] ॥ २ ॥
आशीर्वचनोद्देशें[6] करितों भावें गुरूस नमनातें ॥
सर्वांस[7] वंद्य जो तो देइ कुबुद्धी कधींच न मनातें ॥ ३ ॥

### श्लोक ( उपजाति. )

शृंगारदा जी कवितेस सारी । यथार्थ दासांस पुढेंचि सारी ॥
ठेवूनियां भाव सरस्वतीतें । नमीतसें देइल ती मतीतें ॥ ४ ॥

### ओवी.

भावें शुद्ध करून मन । देवादिकांतें केलें नमन ॥
कथाभागाचें करून मनन । करितों निवेदन यथामति ॥ ५ ॥

---

१ हें श्रीविष्णूचें विशेषण. २ जगताचा. ३ विघ्नविनाशक राया असें संबोधन करावें, अगर पदें निराळीं आहेत तसेंच करावें. ४ त्यांची. ५ मतिहीन ( निर्बुद्ध. ) ६ आशीर्वाद मिळावा या उद्देशानें. ७ मरमावी.

**श्लोक** ( मंदाक्रांता. )

स्वीकृत् केलें कठिण समयीं सद्व्रतातें जयानें[1] ।
सद्भावातें वसवुनि अशा वाढतें तेजें[2] यानें ॥
त्याचें कीर्तीकथन परिसा[3] पूर्ण जें तें जयानें ।
ज्याचें भक्तिश्रवण घडतां सत्वरें तें जया ने[4] ॥ ६ ॥

**श्लोक** ( शार्दूलविक्रीडित. )

साधूनामक वाणि जो प्रियसखी लीलावती जी सती ।
राहे रत्नपुरीं सुखेंयुतें[5] अशी इच्छा मनीं त्यास ती ॥
द्यावें विप्रजना करोनि पुजना द्रव्या अशी सन्मती ।
त्याचें प्राक्तन हें विचित्रचि पहा कीं त्या नसे संतती ॥ ७ ॥

**साकी.**

द्रव्याचें सुख मानाचें सुख परि नाहीं संतान ॥
उपाय नाना नवसहि केले ऊरविलें संतां न ॥ ८ ॥
नृत्यगीतही सुखदायक हे उपाय मन रमवाया ॥
करिती तेणें सुख व्हावें परि गेले सर्वहि वाया ॥ ९ ॥
त्रस्त मानसीं बहुदिन ऐसा कांता दुःखित भारी ॥
साधूसंतां ह्मणती देतां संतति होउं अभारी ॥ १० ॥

**गीति.**

कांता उद्विग्न मनीं संततिवांचून जनन हें फुकट ॥
बोले करीन स्वार्थी—स्तव कोणी व्रत कथील जरि विकट ॥ ११ ॥

---

१ ज्यानें. २ प्रभाव. ३ श्रवण करा. ४ जयाप्रत ने ह्मणजे नेतें. ( अर्थात् जयप्राप्ति होते. ) ५ सुखेंकरून युक्त.

**श्लोक** ( कामदा. )

सर्वही सुखें भोगिलीं परी । संततीविना शून्यमंदिरीं[1] ॥
दिननिशीं मनीं त्रस्त फार हा । ह्मणुनि विक्रेया[2] चालिला पहा १२

**श्लोक** ( यूथिका. )

चालतां शकुन हे बहु जाहले ।
पूर्णकुंभ हयें[3] चामर पाहिले ॥
सुरभि[4] वत्ससहीतहि देखिली ।
तदुपरी तरणी[5] अवलोकिली ॥ १३ ॥

**श्लोक** ( द्रुतविलंबित. )

बसुनियां नवकेमधिं जेधवां ।
वणिज चालत पूढति तेधवां ॥
सुफल काल समीपचि पातला ।
नदितटीं जनसंघ[6] विलोकिला ॥ १४ ॥

**गीति.**

त्या तीरीं वाद्यध्वनि श्रवणीं पडतांचि नाविकां सांगे ॥
क्षणभरि स्वस्थ असावें येतों पाहून काय हें आंगें ॥ १५ ॥

**श्लोक** ( पृथ्वीछंद केकावली. )

असें वदुनियां जनासमिप तत्तिरा पातला ।
कळे न मज भाव हा ह्मणतसे खरा यांतला ॥

---

१ " अपुत्रस्य गृहं शून्यं " तसेंच " गृहरत्नानि बालकाः " अतएव ज्या गृहांत बालकरत्नें नाहींत तें गृह ह्मणजे मंदिर, शून्य होय, त्यांत ( शून्य मंदिरांत. ) २ व्यापारार्थ. ३ अश्व. ( अश्व, चामर, गौ, पूर्णकुंभ, स्त्री इत्यादि वस्तु हिंदुशास्त्रांत शुभशकुन मानिले आहेत. पुष्कळ भाविक लोकांची अशी समजूत आहे कीं, कोठें गमन करावयास निघालें असतां हे शकुन दृष्टीस पडले ह्मणजे लाभ होतो. ) ४ गाय. ५ नौका. ६ जनसमाज.

समूह जमला कशास न सुपेठ[1] यात्रा न वा ।
प्रकार तरि काय हा मज कथा सुपात्रो[2] नवा ॥१६॥

**साकी.**

ऐसें पुसतां लोक सांगती व्रत करितो हा राजा ॥
उल्कामुख हें नाम ययाचें कमलमुखी सति भाजा[3]॥१७॥
स्वसुखें भूपति समीप जा प्रतिबंध नसे कोणाला ॥
प्रसाद भक्षुनि आनंदानें जावें स्वस्थानाला ॥१८॥

**ओवी.**

ऐसी ऐकून जनवाणी । पुढती चाले साधुवाणी ॥
जेथें भूप विष्णुचरणीं । लीन त्या स्थानीं पातला ॥ १९ ॥
भूपें चालविलें पूजन । तंव साधूनें केलें वंदन ॥
तयास राजानें दिधलें आसन । नामाभिधान पूसलें ॥ २० ॥
तेणें आपुलें नामाभिधान । रायासि आदरें कथन करून ॥
ह्मणे रंगलें माझें मन । पृच्छा[4] श्रवण करावी ॥ २१ ॥

**गीति.**

कोण व्रत? केंवि विधी[5]? सद्भावानें किमर्थ आचरिता! ॥
फल काय? इष्टदैवत कथन करा मजशि सर्व तच्चरिता॥२२॥
विनयान्वितोक्ति[6] परिसुनि साधूची हूंप[7] भूपती पुरवी ॥
नुर्वी[8] तत्कांक्षेतें जेंवि तमातें प्रकाशतांचि रवी ॥ २३ ॥

**श्लोक** (अनुष्टुप्.)

सुखार्थ करितों मी हें । सत्यनारायणव्रत ॥
उल्कामुख ह्मणे साधो । श्रीविष्णु इष्टदैवत ॥ २४ ॥

---

१ उत्तम प्रकारचा बाजार. २ जो ज्याविषयीं विशेष आर्त आहे त्यास देण्याविषयीं तो सुपात्र होय. (सुपात्र हें मज याचें विशेषण.) ३ स्त्री. ४ प्रश्न. ५ प्रकार. ६ प्रार्थनापूर्वक भाषण. ७ आशा. ८ न उरवी.

श्लोक. ( वसंततिलका. )

जो नारदा व्रतविधी कथि चक्रपाणी ।
तो भूपती कथित ऐकत साधु वाणी ॥
जी ऐकतां करिल साच फल श्रुतीला ।
आनंदयुक्त परिसाच फलश्रुतीला ॥ २५ ॥

गीति.

भक्तीनें व्रत करितां  फल यापरि दे अचक्षुला नयन ॥
लोभ्या धन वाक् मूका  परि न मिळे राखिला जरी नय न॥२६॥
किति वर्णूं तन्महिमा  अनपत्या संतती स्वयें दे हा ॥
आधिव्याधी निरसुनि  अनुपम सुख सत्य देव करि देहा॥२७॥

श्लोक ( मालिनी. )

परिसुनि फलवृत्ता सौख्य झालें मनाला ।
त्वरित हरलि चिंता तेज ये आननाला ॥
मग वदत नृपाला आजि वाणिप्रतापें ।
मजशि सुत नसे ह्या सोडिलें तीव्र तापें ॥ २८ ॥

श्लोक ( शिखरिणी. )

अशी कर्णी वाणी सुफल मज कोणीं न कथिली ।
फिटे अंतीं भ्रांती रजतरुप कांती न कथिली ॥

---

१ हा प्रकार असा कीं, निशामुखाचे ठायीं सत्यनारायण ( विष्णु ) याची स्थापना करून पूजन करावें व सपाद पदार्थांचा प्रसाद करावा. नृत्य कथा, गीत, आचरावें; वगैरे ( विशेष विस्तार मूळांत पहा. ) २ अंध. ३ संतान ज्यास नाहीं त्यास. ४ मानासिक दुःखें. ५ मुखाला. ६ रुपें ( रुपें आणि कथील यांचा वर्ण एकच दिसतो, परंतु अंतीं रुप्याचें तेज यांत नाहीं असें स्पष्ट कळतें. हा दृष्टांत व्रतांस उद्देशून आहे. )

व्रतें केलीं गेलीं फलद मज झालीं न अधिचीं ।
व्रताधीपा वंदी करि सुशमता दीन अधिची ॥ २९ ॥

**गीति.**

इच्छापूरित धन मज परि दुःखी मीच संततीरहित ॥
आतां सत्येशकृपें झालें करणार हेंचि तीरें हित ॥ ३० ॥

**श्लोक** (पृथ्वीछंद केकावली.)

व्रता करिन संततीस्तव अती मती लोटते ।
विदुःखदचि मन्मनीं नसहती सती—लोट ते ॥
ह्मणून नमनास मी करिन तो दया जाणुनी ।
व्रतेश निजमानसीं करि नतोदया जाणुनी ॥ ३१ ॥

**श्लोक** (छंद.)

मजशि जेधवां होय संतती ।
अनुपमेयशी काय मातें ती ॥
सत्य सांगतों व्रत करीन मी ।
जातसे गृहीं मी करीं नमी ॥ ३२ ॥

**श्लोक** (स्वागता.)

घ्या प्रसाद उपरांत घरा जा ।
यापरी वदतसे मग राजा ॥
ऐकुनी नृपतिची अशि वाणी ।
राहिला स्वसुख इच्छित वाणी ॥ ३३ ॥

---

१ पूर्वीं केलेलीं. २ मानसिक दुःखाची. ३ ज्या नदीतटीं हा होता तें तीर. ४ विशेषेंकरून दुःख देणारे. ५ माझ्या मनाला. ६ समजून. ७ जो नत ह्मणजे नम्र त्याचा उदय (ऊर्जित काळ) तो नतोदय. ८ मुद्दाम. ९ गोष्ट.

**ओवी.**

समग्र पूजा आटपून । विप्र आनंदविले देऊन धन ॥
प्रसादानें अवघे जन । तोषितमन केलें कीं ॥ ३४ ॥
साधू प्रसाद घेऊन हस्तीं । याचे प्रभावें मज संतती ॥
होईल ऐसें मानून चित्तीं । अति प्रीतीनें भक्षीतसे ॥३५॥
झाल्यावरी मज संतान ॥ सत्यव्रत आचरीन ॥
ह्मणे सत्य घडो आपलें वचन ॥ करितों वंदन सर्वत्रां ३६॥
तंव तथास्तु बोलती द्विज ॥ ऐसेंच बोले नृपराज ॥
आपुल्या दासाचें काज ॥ ईश्वर सहज करितसे ॥ ३७ ॥

**गीति.**

भूपा सभ्यां वंदुनि आनंदानें निघे घरीं याया ॥
माहेरीं कन्या कीं दासगृहीं श्रीहरी परी या या ॥ ३८ ॥
निजसदनीं ये साधू कांतेसि कथी सुवृत्त[1] तो मोदें[2] ॥
व्रत संततिदायक मज सांपडलें परिसें[3] येइ रतिमोदें॥३९॥
भूपें आचरिलें व्रत झाली मनकामना पुरी त्याची ॥
कीं तत्प्रसादसेवनिं पूर्ण मनोरथचि कीर्ति सत्याची[4]॥४०॥

**दिंडी.**

प्रसादाच्या सेवना अह्मीं केलें ।
घडो संतान द्विजीं बोलिजेलें ॥
आचरूं हें व्रत जरी प्राप्ति झाली ।
संततीची ही कथा मनीं आली ॥ ४१ ॥

**गीति.**

पतिवच ऐसें परिसुनि तद्भार्या पावलीहि मुदतिशया[5] ॥
प्रेमें दे आलिंगन कंवटाळुनि बाहुनींहि सुपतिशया[6]॥४२॥

---

१ चांगलें वर्तमान. २ आनंदानें. ३ श्रवण कर. ४ सत्यदेव जो त्याची. ५ हर्षातिशयाला. ६ पतीच्या हस्ताला.

**साकी.**

सत्यदयेनें तद्भार्या मग गर्भवतीहो झाली ।
डोहाळे साधूनें पुरवुनि अत्यानंदी केली ॥ ४३ ॥
वर्णूं काय कथा । उपमा नाहीं सत्यव्रता ॥ ध्रु० ॥
आनंदामधिं निमग्न असतां दशमासावधि गेला ॥
कन्यारत्न प्रसूत झाली सुदिन दिवस तो झाला ॥ ४४ ॥

**दिंडी.**

सुता रत्ना पाहून पूर्ण धाला ।
करी उत्साहा तोषवी जनाला ॥
ह्मणे मजला सत्येश पावला हो ।
प्रेम ठेवुनि वंदितां पावलां हो ॥ ४५ ॥
साधु मोदें[1] विप्रांस द्रव्य देई ।
करा पत्रीका वदे लवलाहीं ॥
जन्मकाला पाहून पत्र केलें ।
कलावंती हें नांव ठेवियेलें ॥ ४६ ॥

**ओवी.**

जातकर्म[2] नामकरण[3] । अत्योत्साहें पालकारोहणें[4] ॥
यथाविधी करितां द्वादश दिन । भुक्त झाले आनंदें॥४७॥
अत्यानंद भर्त्याप्रती । अवलोकून लीलावती ॥
व्रतसूचनार्थ पतिप्रती ॥ कौतुकें भाषण करीतसे ॥ ४८॥

**गीति.**

वाङ्माधुर्यें[5] बोले संकल्पित प्राग्व्रता[6] कराना हो ॥
कीं तत्पूजनयोगें सुखकरशी धन्यता करांनीं[7] हो ॥ ४९ ॥

---

१ आनंदानें. २ जन्मतः करावयाचा संस्कार. ३ बारावे दिवशीं नांव ठेवण्याचा विधि. ४ मुलांस पाळण्यांत घालण्याचा विधि. ५ मधुर वाणीनें. ६ पूर्वीचें व्रत. ७ हस्तांस.

### दिंडी.

प्रियावचनें ऐकून मधुर ऐशीं ।
कथी प्रेमें आचरूं पुढें त्यासी ॥
विवाहाचे येतांचि गूण सारे ।
आचरूनी सानंद होउं सारे ॥ १० ॥

शुक्लपक्षीं ती चंद्रकला वाढे ।
तेंवि कन्या लावण्यकला ओढे ॥
दिवसमासीं ये तेज आननीला ।
मातृताता आनंद दे मनाला ॥ ११ ॥

### साकी.

क्रीडा कौतुक पाहुनि नयनीं मधुर सुतेची वाणी ॥
ऐकुनि मानी अन्य न यासम सुख ऐसें तो वाणी ॥ १२ ॥

### श्लोक ( शिखरिणी. )

असें होतां होतां बहुत दिन आप्तांसह सुखी ।
परी कन्या अन्या जवळुनि असा न्याय सुमुखी ॥
असे मानादाना वधुसम निदाना परिसुनी ।
वदे प्रीतीनें ती पतिस सति लीलावति गुणी ॥ १३ ॥

### श्लोक ( भुजंगप्रयात. )

तनूजे पहाया वरोला वराला ।
असा योग्य जो कीं स्मराला हराला ॥

---

१ तोंडास. २ हें कन्येचें विशेषण. ३ मुलीस. ४ वरावयाला. ५ वराप्रत ( नवरे मुलाला. ) ६ मदनास योग्य (येणेंकरून रूपवान असावा ). वा स्मराला हराला योग्य (शरीर सुदृढत्व अ०) ७ हराला ह्मणजे शंकराला स्मराला योग्य ( भक्तिमान )अशा प्रकारें पद चालनेनें वर कसा असावा याविषयीं दोन तीन आणखी श्लेषार्थ निघतात.

असे फार माझ्या मना कामना ती ।
असें त्या कथी यामिनीं[1] कामिनी[2] ती ॥ ५४ ॥

गीति.

स्त्रीवच यापरि परिसुनि सांगे दूतांस कामना वरती ॥
मत्कन्येसि पहा जा योग्य वरायास काम नांव रती ॥ ५५ ॥

साकी.

कांचेन[3] नगरीं दूत येति ते घेउनियां आज्ञेला ॥
पाहति सुंदर वर सुगुणीही योग्य असा कन्येला ॥ ५६ ॥

गीति.

कुलशीलरूपसंप–द्युक्त गुणी पाहिला सुवर त्यांनीं ॥
कीं तो विलोकितां वर स्वमनिं झुरावेंचि इतर वरत्यांनीं[4]॥५७॥

साकी.

सन्मानुनियां कथुनि मनोदय याती सह त्या नेला ॥
विधीविधानें मग साधूनें अर्पियलें कन्येला ॥ ५८ ॥

श्लोक ( शार्दूलविक्रीडित. )

पाचारूनि समस्त आप्तजन ते लग्नास जे आणिले ।
त्यांतें देउनि पुष्पहार गजरे तांबूल तोषीवले ॥
वाद्यें चित्रविचित्र वाजति तयीं वारांगना[5] नाचती ।
आनंदस्थिति पूर्णता मज गमे जी वर्णवेनाच ती ॥ ५९ ॥

श्लोक ( इंद्रवज्रा. )

आनंद साधूस बहूत झाला ।
पाचारिलें त्या स्थलिं हो द्विजांला ॥
मांगल्य वाद्यें विविधं[6] प्रकारी ।
आणीलिं तीं गर्जति सौख्यकारी ॥ ६० ॥

---

१ रात्रीं. २ स्त्री. ३ नामक नगर. ४ वरणाऱ्यांनीं ( वधूनीं. )
५ नृत्य करणाऱ्या स्त्रिया वेश्यादि. ६ अनेक तऱ्हेचीं.

श्लोक (भुजंगप्रयात.)

बहू इष्ट मित्रादिकां भोजनाला ।
बलावूनि तो सौख्य देई जनाला ॥
करी पंच पक्वान्न नाना पदार्थ ।
सुहृन्मित्रें[1] संतुष्ट व्हावे यदर्थ ॥ ६१ ॥

श्लोक (अनुष्टुप्.)

अर्पिलें भोजना द्रव्या प्रार्थिलें बहुतां परी ॥
त्या काळीं अति सर्वत्रां जाहलें सुख अंतरीं ॥ ६२ ॥

गीति.

या परि उत्साह करुनि तोषविले विप्र[2] देउनी दानें ॥
दिधला आनंद असा नसताचि वदे मला न पुत्रानें ॥ ६३ ॥
सर्वां आनंदवि परि झाली कन्या तयासि ज्या नवसें ॥
तें व्रत समयिं करावें या स्मृतिचा लेशही मनीं न वसे ६४
आनंदमग्न होउनि न स्मरुनी सद्व्रतासि अंतरले ॥
दुःखित होतिल तेणें परि अंतीं ह्या व्रतेंचि ते तरलें ६५
भाग्यवशाद्व्रतविस्मृति होतां प्रभुमानसांत ये ऐसें ॥
दावावें दुःख यया जेणें सेवन घडेल मम तैसें ॥ ६६ ॥

साकी.

पुढतीं एके दिवशीं चित्तीं साधुस ऐसें भावे[3] ॥
व्यापारास्तव अन्य ठिकाणीं द्रव्य घेउनी जावें ॥ ६७ ॥

गीति.

जामातृसहित मग तो वाणिज्यार्था धरून चित्तांत ॥
जातां विचित्र गति जी घडली परिसों[4] पुढील वृत्तांत[5] ॥ ६८ ॥

---

१ आप्तमित्र. २ ब्राह्मण. ३ वाटे. ४ श्रवण करा. ५ पुढें जीं वृत्तें आहेत त्यांत किंवा वर्तमान.

**ओवी.**

जामाता घेऊनि बरोबरी । पातले ते रत्नसार पुरीं ॥
तेथें व्यापार करूनि उपरि । पुढें सत्वरें चालले ॥ ६९ ॥

**दिंडी.**

अहो ऐसे चालिले वणिज दोघे । पुढें व्यापारा करित येत ओघें ॥
चंद्रकेतूचें नगर देखियेलें । विक्रयार्थी वास्तव्य तयीं केलें ॥७०॥

**श्लोक ( छंद. )**

विसरला व्रता हेंचि पाहुनी ।
दुःख दाखवी देव त्याहुनी ॥
शाप देतसे तो अशा परी ।
कठिण दुःख हो न तु अशापरी ॥७१॥

**अभंग चारचरणी.**

तया दिनीं ऐसा चमत्कार झाला ।
राजाच्या गृहाला चोर आले॥ ७२ ॥
चोरूनियां धन चालिले माघारें ।
रक्षकानें सारें देखियेलें ॥ ७३ ॥

**पद ( पोवाडा. )**

( जिकडे तिकडे कली मातला कठिण काळ हा आला
पुढें, या चालीवर. )

जिकडे तिकडे दूत धांवती अवलोकाया चोरांला ।
धरणें आलें पाहुन तस्कर[1] पावति ते बहु भीतीला ॥
निद्रित होते वाणी जेथें टाकुनि तेथें द्रव्याला ।
चुकवुनि नजरा जरो भीतभित पळून गेले समयाला ॥

---

१ चोर. २ थोडक्याशा (नजरांचें विशेषण) पूर्वी दुःखी होते त्याहून.

दूत येउनी द्रव्य पाहती बांधिति निद्रत वणिजांला ।
विचारशून्यचि दूत भासती तिळभर नाहिं दया जांला ॥
बद्ध करूनि आनंदानें आणुनि दाविति त्या राजा ।
"बडे हरामी काफर" ह्मणती यांनीं केली असी मजा ॥७४॥

**गीति.**

मार्गीं येतां दूतां दीनापरि विनविती अनेक रिती ॥
तद्बंधमुक्तिसाठीं दुःखित होऊन शोक ते करिती ॥७५॥
परि दोषांतें राया–संनिध आणून करिति लटपट ते ॥
वदती मनमाने तें गत भाग्यें सत्यही उलट पटते ॥ ७६ ॥
हर्षें रक्षक सांगति ऐसे तस्करें न देखिले नयनीं ॥
पाहुनियां आह्मांतें नृपधन संनिध असून हे शयनीं ॥७७॥
पुसतां असत्य वदती ह्मणती धन पाहिलें न नयनांहीं ॥
यापरि आजन्मींही घडला हातून या अनय नाहीं ॥७८॥
नृपधन हें सांपडलें यास्तव धरिले खरेंच ठक वाटे ॥
यांतें दटाविलें बहु न च होती कबुल हे निमक वाटे ॥७९॥

**ओवी.**

ऐशा दूतमुखींच्या वृत्ता । ऐकून आनंद मानिला चित्ता ॥
भूप बोले आज्ञा तत्वता । करितों आतां परिसावी ॥ ८० ॥

**गीति.**

आज्ञा भूप करी तो कारागारीं ययांस घाला हो ॥
धन हरण करा यांचें समजा मनिं बहुतसाचि हा लाहो ८१

---

१ दैवहीनत्वानें. २ हतभाग्य झाल्यावर त्याचें सत्य भाषणही खोटेंच भासतें, मग प्रत्यक्ष राजदूत साधूविरुद्ध सांगत असतां कां खरें वाटणार नाहीं? ३ चोर. ४ अन्याय. ५ निमक हराम. ६ मार्गीं. ७ लाभ.

ऐकुनि राजाज्ञा ती  वदती वाणी अह्मी न तस्कर[1] हो ॥
न्यायें मुक्ति दिल्याचें  जगतीं त्वद्वृत्त[2] गा यशस्कर हो॥८२॥
अपराध नापि घडला  परिसा मद्वच[3] करीत नमनातें ॥
मुक्त्यर्थ[4] वदे वाणी  दीनापरि ती रुचेच न मनातें ॥ ८३ ॥
सत्येशरोपयोगें  त्याचा भूपास तो विनय न जरा ॥
पेटुनि करी पूर्वाज्ञा  होउनियां बंद सर्व नयनं[6]जरा ॥ ८४ ॥

**मदिरा** (सवाई.)

रक्षक जे अति लक्ष विलक्षण लाउनि त्या स्थलिं बैसुनि होते ।
निक्षुनि तत्क्षणिं नेति तयां तयिं भासति राक्षसरूप अहो ते ॥
दक्षपणें वर रक्षुनि वर्तन पक्षधरू कुणि साक्ष मिळेना ।
चक्षु तुला कमलाक्षपते मज रक्षिल या क्षणिं कोण कळेना ८५

**गीति.**

भोगवि कारागारीं  दुःख बहू करिति व्रत न याकरितां ॥
त्या भगवंतदयेविण  न त्रिजगीं तत्र[7] जतन या करितां ॥८६॥

**श्लोक** (भुजंगप्रयात.)

असें त्या द्वया दुःख झालें विशेषीं ।
तयाच्या गृहीं जाहली स्थीति कैसी ॥
बहू चोर आले धनातें हराया ।
महद्दुःख झालें नये सांवराया ॥ ८७ ॥

**गीति.**

पूर्वीच पतिवियोगें  गाईपरि दीन जाहल्या होत्या ॥
तस्कररूपी व्याघ्रा  पाहुनि शर्वतुल्य[8] जाहल्या हो त्या॥८८॥

---

१ चोर. २ तुझें वर्तमान. ३ माझें वचन. ४ सुटावयास्तव. ५ रु-
चून. ६ न्यायदृष्टि. ७ तेथें. ८ प्रेतवत्.

त्या दुष्ट तस्करीं मग न दुजें कोणी गृहांत पाहूनी ॥
ताम्रमयाहि भाजनंसह नेलें धन तें समस्त वाहूनी ॥ ८९ ॥
झाल्या सुदीन अबला पतिविरहाग्नींत नित्य हुरपळती ॥
निर्धन जाणुनि दोघी आप्त सखे सर्व दूरदुर पळती ॥ ९० ॥

श्लोक ( शिखरिणी. )

मनीं भीती मोठी स्वजन धरिती हींच इतुकी ।
समाचारा जातां धन वसन ह्या मागतिल कीं ॥
सखे मामा बंधू सधनसमयीं येति हरिखें ।
अपत्कालीं होती स्वजन परक्यांहून परके ॥ ९१ ॥

श्लोक ( मालिनी. )

कठिण समय येतां रावही रंक होतो ।
परि सुजनपणानें काळ न्यावा अहो तो ॥
त्यजुन कुपंथ राहे देव तत्साह्यकारी ।
निरसन करि विघ्नें तोचि नानाप्रकारीं ॥ ९२ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

जयाच्या सुखा वर्णिती लोक सारे ।
अहा त्या गृहीं काळ आला कसा रे ॥
उरे अन्न वा वस्त्र कांहीं न रामा ।
स्वयें याचिती होउनी दीन रामा ॥ ९३ ॥

गीति.

आधिव्याधीयुतशा होउनि चिंता करीति अन्नाची ॥
फिरती गृहोगृहीं परि स्मृति नाहीं त्या व्रतेशपुजनाची ९४

१ भांड्यासुद्धां. २ वस्त्र. ३ आनंदानें ( हर्षानें. ) ४ दुर्मार्ग.
५ स्त्रिया. ६ मानसिक दुःखें. ७ व्रत–ईश ( सत्यनारायण. )

एके दिवशीं शिणली  न मिळे परि अन्न त्या कलावतिला ॥
तरि त्या ग्रामीं कोणी  प्रेमें न वदेच जा बलाव तिला ९५

**श्लोक** ( मालिनी. )

मग पुनरपि सायंकालिं अन्नार्थ जाई ।
फिरत फिरत एका विप्रसद्मासि येई ॥
सदनिं करित होता विप्र सत्यव्रतातें ।
मनसुख पुरवाया आंगिं ज्या तीव्रता तें ॥ ९६ ॥

**दिंडी.**

तया ठायां ती जाउनियां कन्या ।
पाहि आचरितां व्रता द्विजा अन्या ॥
करुनि नमना प्रार्थना फार केली ।
सुखें येवो पतिपिता बोलिजेली ॥ ९७ ॥

**ओवी.**

सत्यपूजन कथाश्रवण । व्हावया झाली रात्र जाण ॥
तदनंतर प्रसाद सेवून । निघे परतून यावया ॥ ९८ ॥

**अंजनीगीत.**

झाला तनुजेला कां उशिर । रात्री झाली दीड प्रहर ॥
माता मानसीं करी विचार । तों कन्या आली ॥ ९९ ॥
पाहुनि तिजला बोले माता । त्वद्गमनें मज झाली चिंता ॥
तुजला शोधायाला आतां । येतचि मी होत्यें ॥ १०० ॥
रजनी ऐशी होतां जाण । दोषच देतिल बहूत जन ॥
आहों आपण सुकूलवान । कलंक लागल कीं ॥ १०१ ॥

---

१ ब्राह्मणांचे घरीं.  २ मुलीस.  ३ रात्री.

### गीति.

कथितें सन्मार्ग तुला   हितकर सच्छास्त्र मी न नव दावी ॥
वागावें त्याचि पथें   सूज्ञांहीं ज्या दुरुक्ति[1] न वदावी[2] ॥१०२॥

### श्लोक ( पृथ्वीछंद, केकावली. )

निशीस न कधीं सुते गमन सुस्त्रियांनीं करूं ।
परस्थलिं तशांत तूं तरुण नेटकी[3] सुंदरू ॥
भ्रतारचरणांकडे धरुनि दृष्टि ही नश्चर[4] ।
अहर्निशिं[5] मनास ह्या जितुन आठवीं ईश्वर ॥ १०३ ॥
सदां सुख नसे प्रभूप्रतिहि दुःख ये भोगणें ।
अशास्त्रवचि निग्रहें जगिं सुनीतिनें वागणें ॥
असून हतभाग्य गे नितिस रक्षिल्या उत्तमा[6] ।
तरीहि नुपजे दया कधिं न काय सर्वोत्तमा[7] ॥ १०४ ॥

### गीति.

शिष्यां गुरु भक्तां सुर[8]   अमरां[9] श्रीविष्णु हा जसा मान्य ॥
तेंवी सेवेसि पती   सुस्त्रीला योग्य तो न सामान्य ॥१०५॥
पातिव्रत्यावांचुनि   जी स्त्री कंठील काळ वांचून ॥
धिग्धिग् जिणें तियेचें   देतें यच्चरित दुःख वाचूनं[10] ॥१०६॥
ती द्रौपदी अहल्या   तारा मंदोदरी सिता जगतीं ॥
पातिव्रत्यगुणानें   वंद्य जहाल्याचि हस्तिराजगती ॥१०७॥

---

१ वाईट भाषण. २ बोलावी. ३ मनोहर. ४ स्थिर (चल नव्हे.) ५ रात्रंदिवस. ६ हें नीतीचें विशेषण. ७ परमेश्वराला. ८ देव. ९ देवांना. १० वाचणें ह्यापासून झालेलें भू० का० धातुसाधित अ०.

**दिंडी.**

स्त्रियांलागीं हा मुख्य असे धर्म ।
त्यजुनि धर्मा या करिल अन्य कर्म ॥
तरी बद्धक होईल हेंचि वर्म ।
तुला कथिलें मीं सुते धर्ममर्म ॥ १०८ ॥

**श्लोक** ( पृथ्वीछंद, केकावली. )

सुते सुपथ हा बरा तुज न इष्ट चित्तास ये ।
तरी मजशिं दुःख दे बहुत दुष्ट चिंता सये ॥
यमापरिस तें मला बहुत जाचतें दूषण ।
जगीं वदति जें बरें मजशि तें गमे भूषण ॥ १०९ ॥

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

जरी जाहली रात्र तूतें अशी गे ।
तरी दोष देतील हे लोक रंगें ॥
जगीं बोलताती दरिद्रीपणाच्या ॥
मुळें त्यागिती रीति सुस्त्रीपणाच्या ॥ ११० ॥

**अंजनीगीत.**

अन्नासाठीं झालों दीन । तरि भिक्षेला अवघा दीन[1] ॥
आहे त्यांतचि मिळेल अन्न । तें भक्षुनि राहूं ॥ १११ ॥
कठिण बहुतसा काळहि गेला । परि तूं कधिंहि न विलंब[2] केला ॥
आजचि कां गे उशीर झाला । कथन करीं मातें ॥ ११२ ॥

**लावणी.**

( असतां मी निशिदिनीं तुमच्या सेवेसी तत्पर ॥ ह्या चालीवर. )

ह्मणे कलावति ऐकें कारण गे सत्वर माते ।
विप्रगृहीं सुव्रतासि पाहुनि आल्यें धामातें[3] ॥

---

१ दिवस. २ उशीर. ३ घरास.

सत्येशाचा प्रसाद सेउनि ठेवुनि प्रेमातें ।
केलि विनंती पूर्ण करीं माच्चिंतित[1] कामातें[2] ॥
कथा ऐकिली भासे तेणें होइल फल मातें ।
व्रत करितां हें फिरविल वाटे विधिच्या कलमातें ॥
॥ चाल ॥ ऐकुनी सुतेतें काय वदत माता ।
हीं खूणच पटली ऐक कथन आतां ।
मज संतति नव्हती दोघांही चिंता ।
ह्याचि व्रतें मज संतति झाली तूं जन्मा आली ।
जननकालिं हें व्रत करणें परि ती संधी गेली ॥ध्रु०॥१॥

तनुजे[3] तुझिया विवाहसमयीं सद्व्रतआचरणा ।
करणें परि दैवच हें खोटें विस्मरलों चरणा[4] ॥
फलश्रुती ऐकवून मजला केलें तूं स्मरणा ।
प्रस्तुत वाटे तेंचि करावें या अंतःकरणा ॥
मातेच्या संमतासि पाहुनि संचरिलें स्फुरणा ।
पूजेचें साहित्य सुतेनें मेळविलें सदना ॥
॥ चाल ॥ मग इष्ट जनातें सादर[5] बोलविलें ।
तिहिं प्रेमपुरस्कर सद्व्रत आचरिलें ।
सेउनी प्रसादा वदती अंतरले[6] ।
सुखें स्वसदनीं पति यावे ही विज्ञप्ती केली ॥
जननकालिं हें व्रत० ॥ ध्रु० ॥ २ ॥ ११२ ॥

श्लोक (भुजंगप्रयात.)

स्त्रियांनीं गृहीं ईशपूजेसि केलें ।
तयीं सत्यनारायण स्वप्निं गेले ॥

---

१ माझे चिंतिलेले. २ मनोरथाला. ३ मुली. ४ प्रभूचे पायांला. ५ आदरपूर्वक. ६ याचा कर्ता पति.

स्वयें चंद्रकेतूस बोधा करीती ।
कशा दाविल्या साधुतें धाकरीती ॥ ११४ ॥
विना आपराधें सजामात साधू ।
कसा बंदि तूं घातला काय बोधूं ॥
त्वरें मुक्त त्यातें करीं रे नृपाळा ।
असें बोलुनी देव तो गुप्त झाला ॥ ११५ ॥

### ओवी.

दैदीप्यमान भगवंतमूर्ति । पाहतांचि उपजली बहुत भीती ॥
वचन ऐकतां तयाचे चित्तीं । साधुप्रीती उद्भवली ॥ ११६ ॥
राजा अति विस्मित अंतरीं । होऊनि ह्मणे मीं कारागारीं ॥
न्याय न करितां घातले परी । मज ईश्वरीं राखिलें ॥११७॥

### अंजनीगीत.

प्रातःकाल होतां जाण । सभे भूप तो करि आगमन ॥
ह्मणतो ऐका हो सभाजन । कुतुहलें हें मोठें ॥ ११८ ॥
ऐसें बोलुनि सांगे मात । स्वप्नीं झाला मज दृष्टांत ॥
सोडावा साधु सजामात । हो लौकर आतां ॥ ११९ ॥
दूतांलागीं आज्ञापून । आणीले ते महाजन ॥
बोले सुप्रसन्न भगवान । भक्तिबळें तुह्मां ॥ १२० ॥
स्वप्नीं येऊन परमेश्वर । अद्भुत दावी चमत्कार ॥
बिनअपराधी अहांत थोर । परिसा मद्विनती ॥ १२१ ॥

### गीति.

केलें मुक्त तुह्मा जा द्विगुणित धन घ्या सजों सुखें वागा ॥
दैवें दुर्गति झाली श्रीहरिला परि पुजा मुखें वा गा ॥१२२॥

---

१ तुरुंगांत. २ कौतुक. ३ श्रवण करा. ४ बंदिवानाचा पोषाक टाकून चांगला घ्या.

**श्लोक** ( पृथ्वीछंद, केकावली. )

अशीं मधुर भाषणें परिसुनी वदे भूपती[1] ।
सुदैव फिरतां अहो महद[2] कालही कांपती ॥
तिथें मज कसा निघे दम नसे जना धीर तो ।
परी मजशिं मुक्त जो करि तयीं मना धीरतो[3] ॥ १२३ ॥

**कटिबंध.**

हर्ष झाला तयास फार, करूनि भूपा नमस्कार, मार्ग क्रमिती ते सत्वर, तो भगवान् सर्वेश्वर, रूप धरूनि स्वामीवर, होते जामात श्वशूर, समुद्रांत ज्या नौकेवर, तेथें येउन पुसे[4] तयांला, काय असे नौकेंत? मला तें, सांगावें पुसतसें तुह्मांला, ऐकण्याची इच्छा माझी, होउनि राजी, सांगा गाजी, जामात वदे नौकेमाजी, लतापत्रपरिपूरित भाजी, कांहो पुसतां? कोठें वसतां? कोठिल रे तूं कोण गुमास्ता, बोलुनि आधीं तुह्मीच फसतां, पकडीं आतां आपुला रस्ता, इथें कशाला आलासि मस्ता, कोण आह्मी तें नाहिं जाणलें, असशिल इतरातेंचि फसविलें, परी ठका तुज आह्मीं वळखिलें, सत्व पहाया ईश्वर[5] आले, हें न जाणुनी उद्धट बोले, द्रव्यमदानें बहूत डोले, जाईं परत, जिवदान दिलें तुज, ऐशा नाना परी वदला गोष्टी ॥१॥ संपत्ती मोठी खोटी, सत्वाला पडते गांठी ॥ध्रु॥ ऐसें ऐकुनि श्रीरंगानें, ऐशी स्थिति ही धनसंगानें, जाणुनि बोले तो रंगानें, असेंच होइल या भंगानें, अंगानें जारि धष्ट अहां परि, लतापत्रपरिपूरित नौका, होइल ऐसा शापचि ऐका, असें बोलुनि एकिकडे तो, झाला मग अव-

---

१ हे राजा. २ आनंद देणारे. ३ मती. ४ परमेश्वर मुद्दाम वेष पालटून परीक्षार्थ विचारी. ५ रूपधारी परमात्मा.

लोकीं तिकडे, बद्धित होती नौका जिकडे, तींत लतेचे पत्र तुकडे, गुप्त जहालें द्रव्य रोकडें, यापरि मग पाहून रेड, धडपडे मनांतरिं, पडे मूर्छित होउनि धाडकन्, श्वशूर तेथें येउनि झटकन्, काय ह्मणे, हें झालें पटकन्, नेत्राश्रूनें डोळे भरले; शोकस्वरानें कंठ नूरले, ह्मणे व्रतेशा आनादरिलें त्याच्या वचनाला अंतरिलें, तच्छापानें झालों कष्टी ॥ २ ॥ संपत्ती० ॥ध्रु०॥ जगदीशाची अगम्य करणी, मानुनि ऐसें अंतःकरणीं, यद्वचनें ही हलकी तरणी[1], झालि तयाची करूं मनधरणी, चल साधोरे लागूं चरणीं, शुद्धाचरणीं, नामस्मरणीं, प्रेम ठेउनी, तद्यश[2] वर्णी स्पष्ट सुवर्णी, धरणीं चरणीं लोळण घेउनि, श्रेष्ठेशातें तुष्ट करिशि जरि, कष्ट नष्ट हे, होउनि अवघे, स्पष्ट सांगतों, श्रेष्ठत्वातें पावशि निश्चित, दुष्ट मानसीं, होत्साता मग, इष्टसुखातें वरशिल सत्वर, शोक पुरे कर, उपाय सुखकर, सुचला जो तो करुं गा लौकर, कर जोडुनियां विनंति करितां, भगवान तो देइल तुष्टी ॥ ३ ॥ संपत्ती मोठी खोटी ॥ सत्वाला पडते गांठी ॥ध्रु.॥ १२४ ॥

**लावणी.**

( असतां मी निशिदिनीं तुमच्या सेवेला तत्पर ह्या चा० )

यापरि युक्ती सुचतां ते हो बहुतचि आनंदले ।
तापस शोधित होता तेथें उभयतां गेले ॥
वंदन करूनी बोलति तुझिया वचना अंतरलें ।
दीन अह्मी बहू अज्ञानानें अपराधा केलें ॥
अद्भुत माया ईशा तुझि ही आज मला कळलें ।
मायेनें जग मोहित परि मन तव पदिं हें वळलें ॥

---

१ नौका. २ त्याचें यश.

॥ चाल ॥ तूं क्षमा करीं या दीन अशा बालकां ।
हो जसें तसें धन विश्वाच्या पालका ॥
मी शरण तुला मग भोगविशी हाल कां ? ।
काय करूं तव ध्यान कळेना सोडविले बंदीं ॥
वाणुं किती मी शेषहि थकले गति किति मति–मंदीं ।
गर्वा त्यागुनि जे नर लागति ईशचरणछंदीं ।
भक्तांचें त्या देव करी हो बहु मन आनंदी ॥ ध्रु० ॥ १ ॥
स्तुतिही ऐकुनि पाहुनि भक्ती बोले वचनाला ।
कसा करुन अन्याय असा तूं मजला विस्मरला ॥
संकल्पित मम व्रतास त्यागुनि कर्मा अनुसरला ।
दुर्मार्गानें आचरलासी टाकुनि त्या सरलें ॥
ह्मणुनि अशा दुःखांत येशि परि भोग तुझा सरला ।
प्रसन्न झालों भक्तिबळें तुज कोप मनीं विरला ॥
॥ चाल ॥ जाहली कृपा मग धन आलें सर्वही ।
मग सर्व पळे हो मनांतील गर्वही ।
तें होय तयां आनंदाचें पर्वही ।
करूं तुझें व्रत असेंचि बोलुनि पदांबुजों वंदी ।
क्रमिती पथ स्वगृहिंचा सत्वर होउनि स्वच्छंदी ॥
गर्वा त्यागुनि जेनर० ॥ ध्रु० ॥ २ ॥ १२५ ॥

**अंजनीगीत.**

मार्ग क्रमितां ते अवसरीं । समीप आली रत्नपुरी ॥
साधू जामाता अंतरीं । आनंदचि झाला ॥ १२६ ॥

---

१ हें मार्गाचें विशेषण. २ पदकमलांस. ३ पाठविलेला दूत.

**गीति.**

निज वित्तरक्षकातें  पाठविलें सांगुनी स्वसदनातें ॥
प्रेमें त्या दोघींला  आलों हें कळवुनीच वद नातें ॥ १२७ ॥
प्रेषित दूतें येउनि  पाहुनि भार्या कलावती कन्या ॥
ह्मणती कीं धनि गृह हें  कालगती ही अशी असे धन्या १२८

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

जयाची अशी संपती आणि सत्ता ।
तयाच्या गृहीं पाहिली अन्नचिंता ॥
असो पातला हो सजामात भर्ता ।
कथायास पाचारिती ही सुवार्ता ॥ १२९ ॥

**ओवी.**

लीलावती आणि तत्सुता । करीत होत्या मानसीं चिंता ॥
कोण कोठील पुसावें वृत्ता । ह्मणून सत्वर पातल्या ॥१३०॥

**अंजनीगीत.**

माता बोले तुह्मी कोण । केलें कांहो तरि आगमन ॥
ऐकायाला माझें मन । इच्छितसे भारी ॥ १३१ ॥
करून कथनासी यथार्थ । मजला तुमचें अवघें वृत्त ॥
मन्मानसिचा पुरवा हेत । हो लौकर आतां ॥ १३२ ॥

**गीत.**

( दामाजीपंताच्या चालीवर. )

वंदन करुनी मग बोलति दूत । पतिसह जामात ॥
आलों पुढतीं ते मागुनि येत । आहेत नावेंत ॥
आतां येतील सत्वर सारीं । उत्सव होइल आपल्या घरीं ॥ १३३ ॥

१ हें मनुष्यांचें विशेषण.

हारी संकट भक्ताचें हारी । किति वर्णूं थोरी ॥ ध्रु० ॥
चंद्रकेतूच्या ही नगरीं । आले व्यापारी ॥
तेथें वर्तली नवलपरी । भूपगृहीं चोरी ॥
तस्कर पळुनी गेले दूरी । वहीम आला यांचेवरी ॥
हारी संकट भक्ताचें हारी । किति वर्णूं थोरी ॥ १३४ ॥
तेथें पडले मग हे बंदींत । परि केलें मुक्त ॥
सत्येश येउनियां स्वप्नांत । दावी दृष्टांत ॥
वणिजां सोडुनि दे लौकरी । भूपा तरीच तव गत बरी॥१३५॥
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
राजा मग बहु विस्मित होऊन । दोघां आणून ॥
नाहींत अपराधी हें जाणून । करि मुक्ती जाण ॥
द्विगुणित धन देउनि माघारीं । जावयाचि आज्ञा करी॥१३६॥
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
घेऊनि राजाज्ञा द्विगुणित धन । आनंद मानून ॥
येतां मार्गीं हो नारायण । स्वरूप बदलून ॥
पुसतां असत्य वदले त्यासीं । तेणें जाली गत तरि कैसी १३७
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
गुप्त झालें तें अवघें धन । अति दुःखित मन ॥
वंदन करितां देवाचे चरण । शुद्धांतःकरणें ॥
पूर्वीं होतें तैसें झालें । सर्वहि धन मग परतुनि आलें ॥१३८॥
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
ग्रामासन्निध पति जामात । आलों समस्त ॥
आह्मां पाठविलें येथें त्वरित । कळवाया मात ॥
आतां जाउनियां सामोरें । घेउनि यावें तयासि घरीं ॥१३९॥

हारी संकट० ॥ ध्रु० ॥
ऐकूनि दूताचे ऐसे बोल । जेकीं आमोल ॥
कन्येस वाहुनियां निश्चळ । ह्मणे हाचि काळ ॥
संकल्पितव्रत आतां करीं गे । स्वजनांसह त्यातें आदरिं गे १४०
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
तत्काळ मिळवुनियां अवघे जन । केलें शुद्ध मन ॥
स्थापूनि तेथें श्रीनारायण । करिती पूजन ॥
अनन्यभावें व्रता आचरी । मानुनि आनंद नचया सारी १४१
हारी संकट० ॥ ध्रु० ॥
व्रत हो केलें तें अवघें पूर्ण । प्रसाद वांटून ॥
कन्या भक्षण नाकरि आपण । विस्मरली जाण ॥
लगबग पतिमुख बघण्या भारी । ह्मणुनि विसरली निजकैवारी ॥
हारी संकट० ॥ ध्रु० ॥ १४२ ॥

ओवी.

लीलावती आणि कलावती । अवलोकाया पतीप्रती ॥
अत्युत्साहें सत्वरगती । जाती दूतांसमवेत ॥ १४३ ॥

गीति.

गेली प्रसाद त्यागुनि पत्यर्थ सुता ह्मणून तो रागें ॥
भरला सत्यश्रीहरि पुढतीं चालेल काय तोरा गे ॥ १४४ ॥

ओवी.

तंव वर्तला चमत्कार । एकाएकीं उचंबळोनि समुद्र ॥
जामातासह तरणी[१] सत्वर । तेथें अदृश्य जाहली ॥ १४५ ॥
नाविक करिती मनीं विचार । काय अघटित घडला प्रकार ॥
उदक वादळ नसोनि फार । नौका कैसी बुडाली ॥ १४६ ॥

---

१ नौका.

ठाव पाहून शोध करित । परि तो कोठेंही न दिसत ॥
मानसीं जाहले चिंताक्रांत । तों आकांत जाहला ॥ १४७ ॥
साधू पाहूनि हें समग्र । आक्रोशें शोक करी फार ॥
सर्वही करिती हाहाःकार । ह्मणती ईश्वर कोपला ॥ १४८ ॥

**पद.**

( गड्यांनों कृष्णगडी आपुला ॥ या चालीवर. )

अदृश्य पाहुनि जामाता । साधू करि बहु आकांता ॥
काय करिल याची कांता[1] । दाऊं वदनें[2] कसें आतां ॥
दुःख बहु झालें हें मजला । नयनाश्रूंला पूर आला ॥
यापरि करि बहु शोकाला । नय० ॥ ध्रु० ॥
कारागारीं[3] बंधन तें । गेलें सागरिं मज्जन तें ॥
तेंही दुःख कमी झालें । लक्षगुणित हें ओढवलें ॥
त्यागुन जातिल असु[4] मजला । असा हा शोकंद[5] तरु[6] रुजला ॥
यापरि करि बहु शोकाला । नयना० ॥ २ ॥
हृदयीं चेतुनि सांबारी[7] । होइल दुःख तिला भारी ॥
नाहीं सुख या संसारीं । दुःखें भरलीं हीं सारीं ॥
दर्शविण्या कन्या मजला । देवा जन्म दिला तिजला ॥
यापरि करि बहु शोकाला ॥ नयना० ॥ ३ ॥ १४९ ॥

**ओवी.**

शोक पाहून अद्भुत रीती ।
लोक समस्त दुःखित होती ॥
तों लीलावती आणि कलावती ।
दूतांसमवेत पातल्या ॥ १५० ॥

---

१ स्त्री. २ मुख. ३ तुरुंगांत. ४ प्राण. ५ शोक देणारा. ६ वृक्ष. ७ मदन (सांबाचा अरि.)

पाहून मानसीं अति विस्मित ।
ह्मणती जन कांहो दुःखित ॥
लक्ष लाऊनि जों पहात ।
तों चकित मनिं झाल्या ॥ १९१ ॥

**गीति.**

बहु घाबरून बोले ती कन्या वचन जें तयीं लोकां ॥
त्या दुःखद प्रसंगा चित्तीं आणून धैर्य अवलोकां ॥ १९२ ॥
अत्यानंदा त्यागुन आक्रोशें मत्पिताचि आरडतो ॥
भयविव्हल होत्साती त्यांसि पुसे आप्तसंघ कां रडतो ॥ १९३ ॥
तों तद्विलापशब्दीं मृतपतिनामासि ऐकिलें काय ॥
वर्णूं? तत्समयीं तो वातें कदलीव पडतसे काय[3] ॥ १९४ ॥

**श्लोक** (भुजंगप्रयात.)

पडे मूर्च्छना येउनी देह तीचा ।
तयीं दाटला कंठ लीलावतीचा ॥
गतप्राण झाली असा भास तीतें ।
सुते पाहतां जाहला त्या सतीतें ॥ १९५ ॥

**दिंडी.**

वदे शोकें बहु दुःखि होउनी ती ।
सुता एकुलती मम प्राण होती ॥
बाळपणचे मी गूण सांगु काई ।
देइ आनंदा मंजुभापणें ही ॥ १९६ ॥
पतीविरहें मनिं दुःखि कीं असोनी ।
मला दावित्रि आनंद ती हंसोनी ॥

---

१ पहा. २ वाऱ्यानें केळ पडते तद्वत्. ३ देह.

सौख्य व्हावें मज ह्मणुनि विवेकाच्या ।
गोष्टि सांगे सप्रेम सुलोकांच्या ॥ १५७ ॥
सांगें[1] मदनापरि रम्य तिचा कांत ।
त्याशिं कधीं जाहला न एकांत ॥
नाहिं अनुभवलें सौख्यसोहळ्यातें ।
त्यजी तंतू[2] मांगल्यसा गळ्यातें ॥ १५८ ॥
अल्पवय तें परि गूण फार तीचे ।
रूपलावण्यें साम्य करि रतीचें ॥
झोंक गमनाचा शुद्ध गजगतीचा ।
मला देवा घडविशी वियोग तीचा ॥ १५९ ॥
धरुनि हृदयीं आपुल्या सुते[3] बोले ।
बोल मजशीं उघडुनी स्वल्प डोळे ॥
तुझ्या वचना मम कर्ण हे भुकेले ।
असुनि दैवें काय हें असें केलें ॥ १६० ॥
तरी बोलेना सुता स्वमातेशीं ।
अहो पाहीना स्वदृष्टिनें ऐसी ॥
निचेष्टित कीं ती तनू पडलि तैसी ।
शुद्ध प्रेताची गती होय जैसी ॥ १६१ ॥

गीति.

बावरली जननी अति मूर्च्छित पाहून आपुली तनुजा ॥
नयनांनें जल लावी मायेनें ग्रासिलें असें मनुजा ॥ १६२ ॥

---

१ मदन, अनंग हें तद्रूपाचे ठायीं गौणत्व होय परंतु कांत हा सांग मदनापरि. २ मंगलसूत्र. ३ मुलगी.

श्लोक ( मालिनी. )

उदक नयनिं तीच्या लाउनी जों पहात ।
तंव हळु तनुजेनें हालवीला स्वहस्त ॥
नयन उघडितांना तीस ये शोकवेग ।
तंव पुनरपि आली मूर्च्छना ती सवेग ॥ १६३ ॥

श्लोक (द्रुतविलंबित.)

घडिघडीं तिज ये अति मूर्च्छना ।
उघडि ती तयिं निश्चळ नेत्र ना ॥
तळमळे उदकाविण मीन[1] हो ।
कठिण ही स्थिति शत्रुस ही न हो ॥ १६४ ॥

श्लोक ( स्वागता. )

पाहती जनहि केविलवाणी ।
खिन्न सर्व मनिं होउनि वाणी ॥
आननीं[2] फिरविती मग पाणी[3] ।
लावती नयनिं सत्वर पाणी ॥ १६५ ॥

गीति.

पुनरपि नीरस्पर्शें जागृत होतांचि ओरडे माते ॥
नत्कांत मला दावीं त्याविण हें नावरे रडें मातें ॥
होती आस मनीं मज येतील पती पिता सुखानें हो ॥
तों पूर्वार्जितदोषें दैवा कथिलेंचि त्या सुखा ने हो ॥१६६॥

दिंडी.

पूर्व जन्मीं मीं काय पाप केलें ।
अशा रूपें तें आजि फळा आलें ॥

---

१ मत्स्य. २ मुखाचे ठायीं. ३ हात.

तरुण दंपत्यीं[1] विगति असे केली ।
काय वत्सापासून गाय नेली ॥ १६७ ॥
काय केलें मीं कपट गुरूपाशीं ।
काय विप्रांतें उठविलें उपाशीं ॥
नाहिं अनुभविलें कांतसंगमातें ।
मना कैसें शांतवूं सांग माते ॥ १६८ ॥

**गीति.**

पतिचा वियोग घडतां पळही सुस्त्रीस होय युगसम तें ॥
काय कथूं मत्क्लेशा प्राणां[2]चें न दुःख ये समते ॥ १६९ ॥
पतिविरहाग्निज्वाला अति दुर्घट सोसवे न मजला ही ॥
होते सजीव असुनी मत्तनुची गमतसेचि मज लाही ॥१७०॥
हे कांत कसा दिधला अर्धांगीला सुदुस्तर वियोग ॥
मज तो त्या कमलस्थ भ्रमरीतें[3] जेंवि अस्तरवियोग ॥१७१॥

**पद.**

( शिव शिव शिव शिव कांहीं न केलें ॥ सा० ) ( या चालीवर. )

आजि कां रे सखया, टाकुनि गेला ॥
निष्ठुर होऊनि, या दुबळीला ॥ ध्रु० ॥
पाहूनि हर्षें, श्रेष्ठ स्थळाला ॥
मम जनकें[4] मशिं, अर्पीलें तुजला ॥ १ ॥ आजि० ॥
विवाहापासुनि, वियोगचि झाला ॥
प्रेमसुखाचा, शब्द न वदला ॥ २ ॥ आजि० ॥
अति दुर्घट ही, तशि गति मजला ॥
मीन जळाच्या, बाहेर पडला ॥ ३ ॥ आजि० ॥

---

१ नवराबायकोचा जोडा. २ माझ्या देहाची. ३ सूर्यास्तानंतर भ्रमरणीस पतिविरहदुःख होतें तद्वत् मजला. ४ पित्यानें.

मज अबलेचें, दैवत भर्ता ॥
त्याविण दुसरा, न जगीं त्राता ॥ ४ ॥ आजि० ॥
हे मम कांता, चित्तहरा या ॥
अन्य न कोणी, देव स्मराया ॥ ५ ॥ आजि० ॥१७२॥

गीति.

या भूलोकीं न दुजा भर्तृवियोगाग्नि दुःखशमनातें ॥
यास्तव उपाय करणें भासतसे योग्य साहस मनातें ॥१७३॥
त्वद्विरहित पलही मज युगसम भासे ह्मणून तव लोकीं ॥
घेऊनि पादुकांतें येतें मी त्यजुनि देह अवेलोकीं ॥ १७४ ॥

दिंडी.

पाहुनीयां अति शोक वदे माता ।
अगे तनुजे तूं पुरे करीं आतां ॥
आह्मां होतें बहु दुःख सुते पाहीं ।
गोष्ट घडली परतून येत नाहीं ॥ १७५ ॥
तुझ्यासाठीं बहु यत्न सुखें केले ।
तयीं मजला हे आजि दीन आले ॥
अशा मातें तूं केंवि दुःख देशी ।
सती जाऊनी करिशि कीं विदेशी ॥ १७६ ॥

गीति.

माता स्वांकीं घेऊनि युक्त्या करि हृद्य शांतवन कांहीं ॥
कन्या तदा वदे मज दावा पति सद्यशास्तव नका ही१७७
जाची मत्कायेतें दुःखद अत्यंत वीरहानल गे ॥

---

१ हा शब्द श्लिष्ट आहे इकडे लक्ष द्यावें. २ पद्दा. ३ युक्तीनें.
४ विरह हाच अनल ह्म० अग्नि.

तेणें मज हेंचि गमे पतिविण जो व्यर्थ देह हा नलगे १७८
माता वदे पुरा कारें दुःखद हा त्वद्विलाप मत्तनुजे[1] ।
शोकें करूं नको कृश झाली चिताग्निदग्ध[2] त्वत्तनु जे १७९
निकरें वदे सुता मज देह नको तूंचि सागरीं लोट ।
ऐकुनि हें जननीच्या आले दुःखाश्रुसागरीं[3] लोट ॥१८०॥
शोकीं निमग्न होउन करिती अत्यंत मग विलापरवा ।
परवा न धरून वदे बुडतें दुःखार्णवीं मला तरवा ॥१८१॥

श्लोक ( मालिनी. )

मग वदत सुता ती काय सप्रेम माते ।
त्यज लवकरि शोका जाहलें सौख्य मातें ॥
बहुत दिवस ज्याचा जाहलासे वियोग ।
मिळति मरणकालीं पादुका केंवि योग ॥ १८२ ॥

श्लोक ( भुजंगप्रयात. )

जगीं बोलती विप्र ती धन्य रामा[4] ।
पतीसंगती जाइ जी देवधामा ॥
मला आजि दैवें असा योग आला ।
कमी काय तेथें सुखा कौतुकाला ॥ १८३ ॥

श्लोक ( स्वागता. )

मी सुखें करितसें गमनातें ।
दुःख मानुंचि नकोग मनातें ॥
धर्म हाचि सुअहैवपणाचा ।
हा लळा पुरवि दीनपणाचा ॥ १८४ ॥

---

१ माझे मुली. २ चिता हाच अग्नि येणेंकरून दग्ध, हें तनूचे विशेषण. ३ दुःख समुद्रांत. ४ स्त्री.

श्लोक ( भुजंगप्रयात. )

असें ऐकुनी जें स्वमाता सुतेतें ।
वदे शांतवाया कथूं काय तें तें ॥
श्रमें घर्म[1] ये जो मुखांऽभोरुहातें[2] ।
पुसी अश्रु तैसेंच सप्रेम हातें[3] ॥ १८५ ॥

दिंडी.

धन्य तनुजे गे कलावती बाई ।
पतीसाठीं चालली स्वयें देहीं ॥
तुझी कीर्ती गाजेल जगीं पाहीं ।
मजशि दैवीं संतानसौख्य नाहीं ॥ १८६ ॥

गीति.

संततिपासुनि ऐसें होइल अति दुःख हें मला कळतें ॥
जरि देवा पूर्वी तरि नवस कराया कधीं न मन वळतें १८७
नलगे संतति मजला बोले लीलावती विलापरवें ॥
या संततिच्या दुःखें वाटे वहु वांझपण मला बरवें ॥१८८॥

दिंडी.

अरे जामाता काय दुःख दीलें ।
लोभ लावूनी कसें अंतरीलें ॥
तुला तरि मी हा दोष कसा देऊं ।
दोष दैवा लावून काळ नेऊं ॥ १८९ ॥

गीति.

मजसारखी अभागी देवा कोणी असेल कां जाया[4] ॥
दैवा मजवांचुनि तुज जाचाया[5] स्थान नाहिं कां जायां १९०

---

१ घाम. २ मुखकमलास. ३ हातानें. ४ स्त्री. ५ जाचण्याला.

मारुनि हांका यापरि देवा दैवासि कंठ शोकविला ॥
शोक-विलाप अशक्यचि कठिण समय वर्णवे न तो कविला १९१
लोकीं बहु शांतविलें परि कोणी शांत जाहल्या न जरा ॥
आक्रोशें रुदनानें अतिशयितच्चि मंद जाहल्या नजरा १९२

**साकी.**

( हिंदस्थानी भाषेंत. )

तब बनिया यहि करत बिचारा पूर चलत आंखनमों ॥
भवचक्करका फेरा कैसा आवत सब इस मनमों ॥ १९३ ॥
सुनो कहत इस नजीक आकर सोक अबी मत करना ॥
दीननाथ प्रभु सत नारायन यही नाम तुम स्मरना ॥ १९४ ॥
तब बेटी आलिंगन देकर रोवत[1] कहत पिताजी ॥
आया कैसो कठन बखत[2] ये कहां गये नाथाजी ॥ १९५ ॥

**गीति.**

ठेऊनि काळ नेला इच्छा प्रियपतिसह त्वदागमनीं ॥
आतां कंठेल कसा करुनी सुविचार सत्य सांग मनीं १९६

**श्लोक** ( भुजंगप्रयात. )

सुतेची अशी ऐकुनीयां सुवाणी ।
वदे प्रीतिनें तीस तो साधुवाणी ॥
अगे भाव ठेऊनियां ईश्वरातें ।
भजावें तया रक्षि जो त्या क्षरातें[3] ॥ १९७ ॥

**ओवी.**

सत्यनारायण दैवत सुंदर । अघटित तयाची माया अपार ॥
तयाचें स्मरण निरंतर । करीत असावें निर्धारें ॥ १९८ ॥

---

१ रडत. २ वेळ. ३ नाशिवंताला.

ऐकूनियां पित्याचें वचन । प्रेमें बोले तयालागुन ॥
ऐकें करितें जें मी कथन । सावधानचित्तें तूं ॥ १९९ ॥

**दिंडी.**

एक समयीं मी विप्रग्रहीं गेलें ।
सत्यनारायणव्रता देखियेलें ॥
सुखें यावें हा हेतु धरुनि केलें ।
सांग बापा तें काय फळा आलें ॥ २०० ॥

**ओवी.**

ऐकतां व्रताची मात[1] । ह्मणे येणेंचि झालों बंधमुक्त ॥
त्याच काळीं धन अत्यंत । मजला प्राप्त जहालें ॥ २०१ ॥
ह्याचि व्रतें मज संतान । प्राप्त जहालें बंध-मोचन[2] ॥
जरी होईल जामातदर्शन । व्रता करीन सानंदें ॥ २०२ ॥
धांव पाव गा जगन्मोहना । हें अनिवार दुःख साहेना ॥
हो प्रसन्न सत्यनारायणा । करुणा-घना[3] मजवरी ॥ २०३ ॥
ऐकून तयाची कीर्ति ॥ सर्वत्र तद्गुण यश गाती ॥
साधूच्या मानसीं उपजोनि प्रीति ॥ धांवा करिती देवाचा २०४

**धांवा.**

[ विडा घ्याहो नारायणा । कृष्णा जगत्रजीवना ॥ ही चाल. ]

धांवरे नारायणा । आतां येऊं दे करुणा ॥
मजवरी करीं कृपा । दूर करीं या संतापा ॥ ध्रु० ॥
अन्याय काय झाला । जामात अदृश्य केला ॥
सुचेना मज कांहीं ॥ तुजविण कोणी नाहीं ॥ १ ॥ धां० ।
संकटीं पावलासी । भूपा दृष्टांत देसी ॥
आठवूं गुण किती । मंद ही माझी मती ॥ २ ॥

---

१ गोष्ट. २ बंधांतून सुटणें. ३ हे करुणेच्या मेघा.

करीन व्रत तुझें । शरण आलों रे माझे ॥
नयन शीणले गा । येइं येइं पांडुरंगा ॥ ३ ॥
दास हा लीन झाला । अभिमानही बुजाला ॥
वैपरित्य नुरे कांहीं । भक्त नमतसे पायीं ॥ ४ ॥ २०५ ॥

**गीति.**

बहु दुःखें देतांही सुरभक्ती करित हा कसा[1] दास ॥
येतांचि तो सदय प्रभु देईना काय हांक सादासे ॥ २०६ ॥
बहु या दीनस्तुतिला परिसुनि तो दीननाथ गहिंवरला ॥
मग तो नभीं[3] वदे वाक् तेणें हरलाचि शोक महिवरला[4] २०७

**श्लोक.** ( पृथ्वीछंद, केकावली. )

त्वदीय तनुजा[5] अली त्यजुनि मत्प्रसादास ती ॥
विलाप जलधींत[6] मीं ह्मणुनि मग्न केली सती ॥
करूनि गमना गृहीं जरि प्रसाद सेवूनि ये ॥
नभीं वदत देव तो पतिस देखिशी निश्चयें ॥ २०८ ॥

**ओवी.**

ऐसी ऐकूनी आकाशवाणी । हर्षित जाहले सर्व वाणी ॥
कन्या सत्वर प्रसाद सेवुनी । सानंद मनीं पातली ॥ २०९ ॥
तंव पुनरपि उचंबळोनि समुद्र । जामात निघाला बाहेर ॥
पूर्वीपेक्षां ही कांती सुंदर । नयनीं सर्वत्र पाहती ॥ २१० ॥

**साकी.**

गृहीं जाउनी प्रसाद सेवुनि येतां पति अवलोकी ॥
मुखीं अंगुली घालुनियां जन वदति नवल नव लोकीं ॥
वर्णूं काय कथा । उपमा नाहीं सत्यव्रता ॥ध्रु०॥२११॥

---

१ कसोटीस येतांच. २ हांकेस. ३ आकाशांत. ४ पृथ्वीवरचा. ५ मुलगी. ६ समुद्र.

ईश स्तुतितें लोक करुनि मग करिती गृहगमनातें ॥
अनुपमेय आनंद जाहला सर्वांच्या सुमनातें ॥ २१२ ॥

**अभंग चारचरणी.**

आनंद जाहला । तेथें सर्वत्रांला ॥
भक्तांला पावला । सत्यदेव ॥ २१३ ॥
द्रव्येच्छूला जैसा । परीस लाधला ॥
मग काय त्याला । न्यून सांग ॥ २१४ ॥
जन्मांधासी प्राप्त । झाले दिव्य नेत्र ॥
वंध्येला सुपुत्र । होतां जैसा ॥ २१५ ॥
हरणीचें पाडस । चुकोनीयां गेलें ॥
अवचित लाधलें । शोधूं जातां ॥ २१६ ॥
ऐशा या आनंदा । नाहीं हो ऊपमा ॥
वर्णनाची सीमा । झाली सारी ॥ २१७ ॥
बाळकृष्ण ह्मणे । देव करी सारें ॥
वंदावे आदरें । पाय त्याचे ॥ २१८ ॥

**गीति.**

साधूनें सर्व जना पाचारुनि आणिलें स्वसदनातें ॥
सर्वांच्या तत्समयीं दिसली आनंदपूर्ति वदनातें ॥ २१९ ॥
व्रत केलें पुनरपि तें हर्षविलें देउनी प्रसाद जना ।
बोले साधू यापरि कधिंही आनंद जाहला मज ना ॥२२०॥

**ओव्या.**

सर्वत्र गेले स्वगृहाप्रती । अत्याश्चर्य मानसीं करिती ॥
ह्मणती करितां ईशभक्ती । उणें कांहीं नसेची ॥ २२१ ॥
साधू सहकुटुंब उपरांत । येतां पौर्णिमा संक्रांत ॥
नित्य पर्वणी दिवसांत । आचरी व्रत सत्याचें ॥ २२२ ॥

तया व्रताच्या नियोगें । इहलोकीं अनुपम सौख्यभोगी ॥
अंतीं इच्छिती जें पद्योगी । तें सत्यपुरीं लाधलें ॥ २२३ ॥
सहकुटुंब साधू करी भक्ती । ऐसी जे नरही आचरिती ॥
तया इहलोकीं सुखप्राप्ती । सत्यपुर अंतीं लाधतें ॥ २२४ ॥

**समाप्त.**

---

## गीतिपंचक.

### प्रार्थना.

प्रथम प्रसंग माझा त्यांतहि जडधी न फार अभ्यास ।
यास्तव पद्य रचाया भ्यालों दूषणभयेंचि सभ्यांस ॥ १ ॥
परि पुनरपि मन्मनिं ये सज्जन हित कथिति निश्चयें विहित।
बालक चुकतां माता न धरुनि कोपास कथिति जेवि हित २
ऐसें जाणुनि कथिलें साधुचरित्रास मी यथा मतिनें।
श्रीपरमेशकृपेनें झालें संपूर्ण आजि या रितिनें ॥ ३ ॥
काढोत दोष किंवा भूषण देवोत सत्य मत्कृतिला ।
परि पाहोतचि सज्जन कुतुकें या पद्यशा चमत्कृतिला ॥ ४ ॥
बहु भीत भीत आलों योग्य तुह्मां पुढति यावयास न मी ।
मज अव्हेरा वा द्या आश्रय तुमचा सदा पदास नमीं ॥५॥

बा० दि० वैद्य कंनडकर, पु० कर्ते.

## ॥ *आरती श्री सत्यनारायणाची ॥

जयदेवा सत्येशा नारायणमूर्ती ॥ भावें वंदन[1] करुनी करितों मी आरती ॥ ध्रु० ॥ कलियुगिं जन अति दुःखित झाले भवतापें[2] ॥ त्यांचें दुःख हराया नाशाया पापें ॥ देवर्षी[3] त्वत्सन्निध येउनि तव कीर्ती ॥ वर्णन करितां केली तद्धेतूपूर्ती ॥ जय० ॥ १ ॥ कश्चित् काशीपूरीं निर्धन द्विज होता ॥ विप्ररुपातें धरुनी कथिलें त्वद्वृत्ता ॥ जाउनि स्वगृहिं ब्राह्मण तव व्रत आचरितां । अति धन–धान्या मिळुनी हरली तच्चिंता ॥ जय० ॥ २ ॥ विप्रापासुनि काष्ठक्रेत्या[4] व्र[illegible] कळलें ॥ सुंदर व्रत पाहुनियां तन्मनही वळलें ॥ तेणें [illegible] गुणित धन त्या काष्ठांचें आलें ॥ करितां व्रत सुख दे[illegible] मोक्षपदा नेलें ॥ जय० ॥ ३ ॥ साधू–भक्ती पाहुनि [illegible] नहि देशी ॥ पूर्ण मनोरथ करुनी महिमा दावीशी ॥ अद्भुत माया देवा दावुनि वणिजांसी ॥ व्रत आचरितां अंतीं सत्यपुरीं नेसी ॥ जय० ॥ ४ ॥ प्रसाद देती गोपहि करुनी तव पूजा ॥ न स्वीकारी त्यातें अंगध्वज राजा ॥ प्रताप दावुनि लाविसि भक्तीच्या काजा ॥ अंतीं दिधली आज्ञा सत्यपुरीला जा ॥ जय० ॥ ५ ॥ अति दुस्तर भवसागर ते नर हीं तरती ॥ जे तव सुखकर–चरणा नित्य मनीं स्मरती ॥ देवा तव भजनानें तापत्रय हरती ॥ दिनकर–सुत पद–कमलां आठवितों चित्तीं ॥ जयदेवा० ॥ ६ ॥

---

* ही आरती दक्षिणा प्राईज कमेटीस जी प्रत पाठविली होती त्यांत नाहीं.

१ नमस्कार. २ संसार दुःखानें. ३ नारद. ४ लांकडें विकणारा.

# विक्रीस तयार.

## प्राकृत.

| | किं० | ट० |
|---|---|---|
| शकुंतलाचरित्र ... ... ... | ऽ- | ऽ॥ |
| शिवलीलामृत. रेशमी ... ... ... | ०॥० | ऽ-॥ |
| श्रीएकनाथचरित्र ... ... ... ... | ०।।।० | ऽ= |
| श्रीमंत पहिले बाजीराव बल्लाळ पेशवे यांचें चरित्र ... | ०॥० | ऽ- |
| श्रीज्ञानेश्वरचरित्र ... ... ... ... | ०।।।० | ऽ= |
| सवाई माधवरावसाहेब ... ... ... | ऽ≡ | ऽ॥ |
| सदाचार ... ... ... ... | १। | ऽ= |
| [illegible]दर्तन ... ... ... ... | ०।।।० | ऽ-॥ |
| [illegible]ा सुलभ संवाद ... ... ... ... | ऽ- | ऽ॥ |
| [illegible] युएल जान्सन ... ... ... ... | ०।≡ | ऽ- |
| [illegible]ीचरित्र ... ... ... ... | ऽ॥ | ऽ॥ |
| [illegible]ियदर्शिका ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| सु[illegible] विक्रमोर्वशी ... ... ... ... | ऽ≡ | ऽ॥ |
| सुलभशाकुंतल ... ... ... ... | ऽ=॥ | ऽ॥ |
| सुशीलयमुना अथवा वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाची धामधूम ... ... ... ... | ०।।।० | ऽ-॥ |
| सोपीं गाणीं ... ... ... ... | ऽ- | ऽ॥ |
| सोळासोमवार ... ... ... ... | ऽ- | ऽ॥ |
| स्त्रीशिक्षणबोध ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| स्वदेशाभिमान ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| श्रीमद्भगवद्गीता, सुबोधचंद्रिका ... ... ... | ०॥=॥ | ऽ- |
| बालबोध पहिलें पुस्तक ... ... ... | ऽ- | ऽ॥ |
| ,, दुसरें पुस्तक ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| हरिविजय. (ओंवीबद्ध) ... ... ... | १ | ०॥० |
| निवडक बोधपर पदें व अभंग ... ... | ऽ-॥ | ऽ॥ |
| मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार ... ... | १। | ऽ= |
| शनिमाहात्म्य. (ओंवीबद्ध) ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| देहावरनिराकारी अभंग ... ... ... | ऽ-॥ | ऽ॥ |
| देवीमाहात्म्य. (सप्तश० प्रा० ओं० टीका.) ... | १। | ऽ= |

| | किं० | ट० |
|---|---|---|
| विष्णुबावा ब्रह्मचारीकृत वेदोक्तधर्मविचार ... | ०।≡ | ०॥ |
| विदुरवचन ... ... ... ... | ०— | ०॥ |
| विद्यार्थी ... ... ... ... | ०—॥ | ०॥ |
| विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र ... ... ... | ०—॥ | ०॥ |
| वियुक्तदंपती प्रहसन ... ... ... | ०।० | ०॥ |
| आनंदराव ... ... ... ... | ०≡ | ०॥ |
| आर्यवृत्त ... ... ... ... | ०— | ०॥ |
| आरत्या.—भाग पहिला ... ... ... | ०॥ | ०॥ |
| आल्फ्रेद धि ग्रेत ह्याचें चरित्र ... ... | ०॥= | ०— |
| इंग्रजी सुरस रत्नमाला ... ... ... | ०≡ | ०। |
| इंद्रियमहत्त्वविचार ... ... ... | ०॥० | ० |
| कहाण्या ... ... ... ... | ०≡ | |
| कालिदासकविविरचित रघुवंशनामक महाकाव्य ह्याचें मराठी पद्यात्मक भाषांतर ... ... | २ | |
| कादम्बरी कथासार ... ... | ०≡ | |
| कृष्णाकुमारी काव्य ... ... | ०।— | ०॥ |
| गरुडपुराण ... ... ... | १। | ०= |
| गीतापद्यमुक्ताहार ... ... | २ | ट.स. |
| गृहवैद्य ... ... ... | ०।॥० | ०= |
| चमत्कारीक नाटक ... ... | ०॥= | ०— |
| छत्रपति संभाजीमहाराज ... ... | १। | ०= |
| जन्माष्टमी ... ... ... | ०= | ०॥ |
| तुकारामाचे स्वर्गारोहणाचे अभंग ... ... | ०॥ | ०॥ |
| तुकारामाष्टक ... ... ... | ०॥ | ०॥ |
| दामाजीपंताचें चरित्र ... ... | ०— | ०॥ |
| दारूची लावणी ... ... ... | ०। | ०॥ |
| दिनार्बस. ... ... ... | ०।॥= | ०—॥ |
| दिवाळी ... ... ... | ०— | ०॥ |
| दुःखिताश्रुमार्जन ... ... ... | ०≡ | ०॥ |

हीं पुस्तकें मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर “ निर्णयसागर ” छापखान्यांत रोख पैसे पाठविले असतां विकत मिळतील.

| | |
|---|---|
| ...ात्म्य सप्तशतीवर प्राकृत ओवीबद्ध टीका ... ... ... ... | किं. १। रु. ट. २ आ. |
| ...ष्टसंरक्षण ... ... ... ... | किं. ८ आ. ट. १ आ. |
| ...पदीहरण ... ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| धर्मसिंधु पाकृत भाषांतरसहित ... ... | किं. ६ रु. ट. ६ आ. |
| धर्मराजद्रौपदीसंवाद ... ... ... | किं. १॥ आ. ट. ॥ आ. |
| धांवे व पदें ... ... ... ... | किं. । आ. ट. ॥ आ. |
| ...व्याख्यान .. ... ... ... ... | किं. ॥ आ. ट. ॥ आ. |
| ...मयंतीचरित्र ... ... ... ... | किं. ४ आ. ट. ॥ आ. |
| ... गंगू ... ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| ...मार ... ... ... ... | किं. २॥ आ. ट. ॥ आ. |
| ...विचार ... ... ... ... | किं. २ आ. ट. ॥ आ. |
| ... ... ... ... ... | किं. ॥ आ. ट. ॥ आ. |
| ... ... ... ... ... | किं. ४ रु. ट. १४ आ. |
| ...आणि परमार्थ ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| ...यदर्शिका ... ... ... ... | किं. ८ आ. ट. १ आ. |
| ...ांची परडी ... ... ... ... | किं. ४ आ. ट. ॥ आ. |
| ...ामित्र ... ... ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| ... भाग दुसरा (डिपोनें पूर्वी छापलेलें.) | किं. १२ आ. ट. २ आ. |
| ...ें पुस्तक, ओककृत ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| ...ुस्तक, ओककृत ... | किं. २ आ. ट. ॥ आ. |
| ...लह उत्पन्न होऊन विभक्त होणें त्याचीं कारणें व ते न होण्याचे उपाय | किं. ४ आ. ट. ॥ आ. |
| ...ुदास चरित्र ... ... ... ... | किं. ३ आ. ट. ॥ आ. |
| ...निरास ... ... . ... | किं. ८ आ. ट. १ आ. |
| ...भूपाळ्या ... ... ... ... ... | किं. ॥ आ. ट. ॥ आ. |
| मनुवचन ... ... ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| मदालसाचरित्र ... ... ... ... | किं. २ आ. ट. ॥ आ. |
| ...ळ्यांच्या संबंधानें चार उद्गार ... | किं. ५। रु. ट. २ आ. |

| | |
|---|---|
| महामारी ... ... ... ... ... | किं. ६ आ. ट. ॥ |
| मनुकथामृत ... ... ... ... | किं. ३ आं. ट. ॥ आ. |
| मुद्राराक्षसकथासार ... ... ... | किं. ३ आ. ट. ॥ आ. |
| मुलांस उत्तम बक्षीस ... ... ... | किं. ८ आ. ट. १ आ. |
| मुलांचें कल्याण ... ... ... ... | किं. १॥ आ. ट. ॥ आ. |
| मुंबई युनिव्हर्सिटीचे संस्कृत म्याट्रिक्युलेशन पेपर व त्यांचीं उत्तरें १८६२—१८८९ | किं. १ रु. ट. १ आ. |
| ययातिराजाची कथा ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| यशोदागीत ... ... ... ... | किं. ॥ आ. ट. ॥ |
| राजगुरु दादोजी कोंडदेव आणि छत्रपति शिवाजीमहाराज ... ... ... | किं. ६ आ. ट. |
| रामवर्मा ... ... ... ... ... | किं. १ आ. |
| रामविजय ओंवीबद्ध ... ... ... | किं. ३ रु |
| रुक्मिणीस्वयंवर रेशमी ... ... ... | किं. ८ आ. |
| लहान मुलांचें शिक्षण ... ... ... | किं. २ आ. ट. ॥ आ. |
| वाल्मीकि रामायणाचें मराठी भाषांतर ... | किं. २० रु. ट. १ रु. |
| वासवदत्ताकथासार... ... ... ... | किं. १ आ. ट. ॥ आ. |
| विचारसाधन ... ... ... ... | किं. ५ आ. ट. ॥ आ. |
| वृत्तावतंस (लोलिंबराजकृत) प्राकृत श्लोकबद्ध भाषांतरासहित ... ... ... | किं. २ आ. |
| वैद्यकीय चुटके. (नकला) ... ... | किं. ३ आ. |
| वियुक्तदंपतिप्रहसन ... ... ... | किं. ४ आ. |
| वेणीबंधन ... ... ... ... ... | किं. ६ आ. |
| शिनग्याविषयीं थोडा विचार ... ... | किं. ॥ आ. |
| शब्दकमलाकर. प्राकृतभाषा ... ... | किं. ४ रु. |
| चंद्रसेना अथवा अहिमहिनिधन... ... | किं. २ आ. |
| सुगम प्रियदर्शिका ... ... ... | किं. २ आ. |

हीं पुस्तकें निर्णयसागर छापखान्यांत रोख किंमत असतां विकत मिळतील.

संग्रहालय
70